# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
## ब प्रभाग कार्यालय, चिंचवड – ३३
## निविदा नोटीस क्रमांक – ६ / २०१०-२०११

पिंपरी चिंचवड ब प्रभाग कार्यालयाकडुन खालील नमुद केलेल्या विद्युत कामांसाठी ई-टेंडरिंग पध्दतीने परसेंट रेट निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रावेत उपविभागातील सो.व्हे.दिवे (पोल फिटींगची) वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे | ९२९७८५ | ९२९८ | ४६४८९ | १२ महिने | ५०० |
| २ | आय.टी.आय. मोरवाडी येथील मशिनरीची देखभाल दुरूस्ती करणे | ४६६७२८ | ४६६७ | २३३३६ | ६ महिने | ३०० |
| ३ | ब प्रभागाअंतर्गत मनपा भवन अंतर्गत आवश्यक ठिकाणी दिवा बत्तीची सोय करणे. | ५७८८४० | ५७८८ | २८९४२ | ६ महिने | ५०० |
| ४ | मोरवाडी आय.टी.आय येथील विस्तारीत इमारतीचे विद्युतीकरण करणे | ४२०१५८ | ४२०२ | २१००८ | ६ महिने | ३०० |
| ५ | ब प्रभाग कार्यक्षेत्रातील सर्व झोपडपट्टी, गरिब शहरी वस्ती साठी दिवा-बत्तीची सोय करणे | ९३३११० | ९३३१ | ४६६५६ | १२ महिने | ५०० |
| ६ | ब प्रभागाअंतर्गत चिंचवड विभागातील रस्त्यावरील पोल व फिटींगचे नुतनीकरण करणे | ९३३२४६ | ९३३२ | ४६६६२ | ६ महिने | ५०० |
| ७ | ब प्रभागाअंतर्गत चिंचवड विभागातील वाहतुकीस तसेच रस्ता रूंदीकरणात येणारे फिडर-पिलर व पोल शिफ्ट करणे, दुरूस्त करणे व सो.व्हे.दिव्यांची दुरूस्ती करणे. | २०७८९३ | २०७९ | १०३९५ | ६ महिने | ३०० |
| ८ | प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील ध्वनीक्षेपन यंत्रणेची चालन देखभाल दुरूस्ती करणे | १४९५३८ | १४९५ | ७४७७ | ३ महिने | ३०० |
| ९ | चिंचवड विभागातील आवश्यक त्या ठिकाणी दिवा बत्तीची सोय करणे | ३१५१२२ | ३१५१ | १५७५६ | ६ महिने | ३०० |
| १० | ब प्रभागातील विविध शाळा इमारतीमध्ये आवश्यकते नुसार विद्युतीकरण्याची कामे करणे | २८००३५ | २८०० | १४००२ | ६ महिने | ३०० |
| ११ | ताथवडे गावातील सो.व्हे.दिव्यांची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | ६२९९७३ | ६३०० | ३१४९९ | १२ महिने | ५०० |
| १२ | रावेत उपविभागातील वॉर्ड क्र.५६,५७,५८ मधील फिडर पिलरची दुरुस्ती करणे. | ४६७३३० | ४६७३ | २३३६६ | १२ महिने | ३०० |
| १३ | रावेत उपविभागातील शाळा इमारती दवाखाने इमारती दवाखाने इ. ठिकाणी विदयुत विषयक कामे करणे. | ६७२८२१ | ६७२८ | ३३६४१ | ६ महिने | ५०० |
| १४ | रावेत उपविभागातील ताथवडे गावातील आवश्यक ठिकाणी नविन रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणे. | ९२९६४० | ९२९६ | ४६४८२ | ३ महिने | ५०० |

वरील अ.क्र. १ ते १४ कामांसाठीचा तपशील उदा. बयाणा, अनामत रक्कम, निविदेच्या अटी शर्ती, निविदा शेड्युल इ. माहिती म.न.पा च्या www.pcmcindia.gov.in या वेब साईट वर उपलब्ध आहे. सदरची निविदा पध्दत ई - टेंडरींग पध्दतीने मनपा च्या वेब साईट वरून भरावयाची आहे. या कामी मनपाच्या स्थापत्य/ विद्युत विभागात ई - टेंडरींग प्रकियेद्वारे निविदा भरणेबाबत ज्यांनी रजीस्ट्रेशन केले आहे अशानांच निविदा दर भरता येईल. ठेकेदार नोंदणी बाबतची सविस्तर माहिती स्थापत्य/ विद्युत विभागात मिळेल. सदरची ई टेंडरींग प्रकियेअंतर्गत निविदा दि. २७/८/२०१० ते दि. १६/९/२०१० दु. ३.०० वाजेपर्यंत ई टेंडरींग पध्दतीने वेबसाईट वरून भरता येतील. निविदा धारकांनी निविदेची फॉर्म फी बयाणा रक्कम मनपा पेमेंट गेटवे सिस्टीमद्वारे भरावयाची आहे. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशत: मंजुर अथवा ना मंजुर करणेचा अधिकार मा. प्रभाग अधिकारी, ब प्रभाग कार्यालय यांनी स्वत:कडे राखुन ठेवले आहेत.

सदरच्या निविदा www.pcmcindia.gov.in या वेब साईटवर उपलब्ध आहे. कामामंबधीच्या इतर अटी व तपशील कार्यालयात पहावयास मिळतील.

सही/-
कार्यकारी अभियंता (वि)
ब प्रभाग कार्यालय
पिं.चि.म.न.पा, चिंचवड – ३३

सही/-
प्रभाग अधिकारी
ब प्रभाग कार्यालय
पि.चि.म.न. पा, चिंचवड - ३३

जाहीरात क्रमांक :- १३३
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड – ३३
क्रमांक :- बप्र/९ /कावि/ १३०/२०१०
दिनांक :- १३ / ८ /२०१०

Etender/tender.doc

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
# ब प्रभाग कार्यालय, चिंचवड – ३३

निविदा नोटीस क्र. ६/२०१०-२०११ विद्युत विषयक कामांची निविदा ई टेंडरींग पध्दतीने मनपाच्या वेब साईट वरून भरावयाचे आहे. याकामी मनपाच्या विद्युत विभागात ई टेंडरींग प्रक्रियेद्वारे निविदा भरणे बाबत ज्या ठेकेदारांनी रजिस्ट्रेशन केले आहे अशानांच निविदा दर भरण्यात येतील. सदरची ई टेंडरींग प्रकियेअंतर्गत निविदा दि. 27 / 8 / २०१० ते दि. 16 / 9 / २०१० दु. ३.00 वाजेपर्यंत ई टेंडरींग पध्दतीने वेबसाईट वरून भरता येतील. निविदा धारकांनी निविदेची फॉर्म फी बयाणा रक्कम मनपा पेमेंट गेटवे सिस्टीमद्वारे भरावयाची आहे.

## कामासंबधीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१). कोणतेही कारण न देता सदर निविदा स्विकारणेचा / नाकारणेचा हक्क, मा. प्रभाग अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे. अटीयुक्त निविदा स्विकारणेत येणार नाही.

२). ठेकेदारांने वापरावयाचे साहित्य व कामाचा दर्जा हा कामाचे तात्रिंक आवश्यकते नुसार असणे आवश्यक आहे. कामाचा दर्जा व कामामध्ये वापण्यात येणारे साहित्य निकृष्ठ दर्जाचे असलेचे निदर्शनास आलेस सदरचे साहित्य पुरवठा व उभारणी करणे, ठेकेदाराने विनामुल्य करून देणे तसेच सदर कामांचा हमी कालावधी ठेकेदारावंर बंधन कारक राहील.

३). ज्या ठेकेदारांची निविदा स्विकारली जाईल त्यांस त्या कामापोटी दर्शविलेप्रमाणे अनामत रक्कम भरावी लागेल व स्वखर्चाने रक्कम रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर योग्य तो करारनामा करून द्यावा लागेल.

४). ज्या ठेकेदारांना कामाचे आदेश मिळेल त्यांनी कंत्राटी कामगार अधिनियम १९७० प्रमाणे पुर्तता करून तसा अहवाल दाखला सादर करणे आवश्यक आहे.

५). सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना बयाणा रक्कम भरणेबाबत शासनाकडुन मिळणारी सुट अनुज्ञेय असणार नाही. तथापी अनामत रकमेत ५० टक्के सुट अनुज्ञेय राहील.

६). ज्या ठेकेदारास अथवा ठेकेदारी संस्थेस काम मिळेल अशाकडुन करारनामा करण्यापुर्वी अशा ठेकेदारी संस्था मनपाच्या विद्यमान नगरसेवक/स्वीकृत सदस्य यांचेशी संबधित नाही याची खातरजमा होण्याकरीता रक्कम रू. १००/- च्या जनरल स्टॅम्प पेपरवर संबधित ठेकेदार /ठेकेदारी संस्था यांनी प्रतिज्ञा प्रत नोटराईज्ड करून द्यावे लागेल.

७). ज्याठेकेदाराची निविदा स्विकारली जाईल त्यास त्या कामापोटी दर्शविलेप्रमाणे १००/- रू रकमेच्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यात करारनामा स्वखर्चाने करून द्यावा लागेल.

८) कामावर वापरलेले साहित्य कमी दर्जाचे आढळुन आल्यास असे साहित्य ठेकेदाराने स्वखर्चाने काढुन योग्य त्या प्रतिचे साहित्याचा पुरवठा व उभारणी स्वखर्चाने करून द्यावी लागेल.

९) ज्या ठेकेदारांस उपरोक्त कामे देण्यात येतील अशा ठेकेदारांनी सदर कामाकरिता/कामावर वापरावयाच्या साहित्याकरिताचा (Contractors All Risk Insurance Policy) तसेच सदर कामे पुर्ण करण्यासाठी करण्यात येणा-या "कामगारांचा कामगार नुकसान भरपाई विमा" उतरविणे बंधनकारक असुन कामाचे आदेश देण्यापुर्वी अथवा प्रथम बिल अदायगी पुर्वी तत्सबंधीत कागदपत्रे मुळ प्रतीत सादर करावी लागतील **अन्यथा १ टक्का रक्कम बिलातून वसुल करणेत येईल.**

१०) कामाच्या आदेशाच्या तारखेपासुन ते. काम पुर्ण करून कामाचा हमी कालावधी संपे पर्यंत निविदा अटी शर्ती नुसार आणि निविदा सर्वसाधारण अटी शर्ती नुसार काम करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

११) भुमिगत केबल व इतर कामासाठी हमी कालावधीमध्ये तांत्रिक कारणास्तव कोणत्याही सजीवास इजा अथवा प्राण हानी झाल्यास त्याची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी व अपघाताचे दायीत्व ठेकेदाराचे राहील.

१२) कामावर उपयोगात आणलेल्या साहित्यांचे पुरवठाधारकाकडील चलने जोडणे आवश्यक आहे. मनपा हद्दीबाहेरील साहित्याची चलने असल्यास त्याबाबत जकात भरल्याची पावती जोडावी तसे न आढळल्यास बिलातून नियमानुसार जकात वसूल करण्यात येईल.

१३) निविदा दरापेक्षा कमी दराची निविदा असल्यास आणि त्या निविदेतील कामे पुर्ण करण्यासाठी ज्यादा बाबी करणे क्रमप्राप्त ठरल्यास, ज्यादा बाबींचे काम निविदा स्विकृत दरामध्ये करणे ठेकेदारावंर बंधन कारक राहील तसेच निविदा दरापेक्षा निविदा ज्यादा दराची असल्यास ज्यादा बाबींचे काम निविदा दराने करणे ठेकेदारांवर बंधनकारक राहील.

१४) सदर कामासाठी घेण्यात येणारी अनामत रक्कम हि त्या कामाचा DEFECT LIABILITY PERIOD १२ महिन्याचा राहील.

१५) सदर कामावर वापरायोग्य साहित्याचे उत्पादित कंपनीमध्ये विभागाचे प्रतिनिधी मार्फत तांत्रिक तपासणी करून कंपनीकडील तांत्रिक क्षमता तपासणी प्रमाणपत्र तसेच आवश्यकतेप्रमाणे साहित्यांची शासकीय प्रयोगशाळेकडून तांत्रिक तपासणी ठेकेदाराने स्वखर्चाने करून तपासणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

१६) विद्युत कामाचा दर्जा इंडीयन इलेक्ट्रिसिटी नियमानुसार राखून सदर काम चालु करणेस योग्य असलेबाबतचा दाखला विद्युत निरिक्षक सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडुन स्वखर्चाने सादर करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहिल तसेच

काम पुर्णत्वानंतर काम कार्यान्वित करून म.रा.वि.वि.कं.लि. हस्तांतरीत करणेची समुचीत जबाबदारी ठेकेदारांची राहील.

१७). सदरचे काम दिलेल्या मुदतीत पुर्ण न केल्यास त्यास अथवा काम पुर्ण करणेस ठेकेदारांच्या निष्काळजीपणामुळे विलंब झाल्याचे निदर्शनास आल्यास कामांची मुदत संपलेल्या तारखेपासून तारखेपासुन प्रतिदिनी र.रू. ५००/- दंड कोणतेही कारण, कोणतीही सबब विचारात न घेता आकारण्यात येईल.

१८). महाराष्ट्र राज्य विजवितरण कंपनी लि. यांच्याकडुन समन्वय साधुन ठेकेदाराने कामाचे मार्किंग करून घेणे त्याचबरोबर म.रा.वि.वि.कं.लि कंपनीच्या मंजुर अंदाजपत्रकावर नियमानुसार येणारे वीज परिवेक्षण शुल्क स्व:र्चाने अदा करणेची जबाबदारी ठेकेदारांची राहील तसेच वेळोवेळी म.रा.वि.वि.लि. कडुन शटडाऊन घेणे (लाईन बंद करून घेणे) ही सम्मुचित जबाबदारी ठेकेदारांची राहील.

१९). मनपा कामावर वापरावयाच्या केबल वर प्रतिमिटर PCMC छाप असावा, तसेच प्रतिमिटरवर केबल रनिंग लांबी असावी तथापि ५०० मीटरपेक्षा कमी केबल लागत असेल तर बंधन असणार नाही. पंरतु मान्यता प्राप्त यादीतीलच मेक असावा.

२०). ज्या ठेकेदारास अथवा ठेकेदारी संस्थेस काम मिळेल व त्याची निविदा स्विकृत झालेनंतर करारनामा करणेपुर्वी असा ठेकेदार/ठेकेदारी संस्था मनपाचे विद्यमान नगर सेवक अथवा स्विकृत सदस्य यांचेशी संबधीत नाही याची खातरजमा करून तशा आशयाचे प्रतिज्ञापत्र रक्कम रूपये १00/- चे स्टॅम्पपेपरवर नोटराईज करून द्यावे लागेल.

२१). शासनाने लागू केलेला सेवा कर व सर्व प्रकारचे कर भरणेची जबाबदारी ठेकादाराची राहील.

२२). मान्यता प्राप्त यादीमधील साहित्य वापरणे तसेच तांत्रिक तपशीलानुसार काम करणे बंधन कारक आहे. सदर मान्यता प्राप्त यादी व तांत्रिक तपशील प्रभाग कार्यालय विद्युत विभागामध्ये मिळेल.

२३) ज्या विदयुत ठेकेदाराला १५% ते २५% कमी दराने काम मिळाले त्यांनी ५% जास्त अनामत तसेच ज्यांचा दर २५% ते ३५% कमी असेल त्यांना १०%जास्त अनामत व जे ३५% जास्त कमी असतील त्यांना १५% जास्त अनामत भरावी लागेल. ३५% कमी वरील ठेकेदाराचा कामाचा हमी कालावधी दोन वर्ष राहील.

२४) विदयुत विभागाच्या निविदामध्ये जी कामे नमुद केलेली आहेत त्यां कामांपैकी एका ठेकेदारास फक्त दोनच कामे प्रदान करण्यात येतील त्यासाठी निविदा उघडताना निविदा नोटीसमध्ये नमुद क्रमाने निविदा उघडणेत येतील. एखादया ठेकेदारास दोन कामे प्राप्त झाल्यावर पुढील निविदा कामे उघडणेत येणार नाही.

२५) अ.क्र.१ ते १४ या निविदासाठी निविदेतील सेवा वाहिन्या टाकण्याच्या बाबींचा दरामध्ये सदर सेवा वाहिन्यासाठी खोदण्यात आलेले चर मानांकानुसार पूर्ववत करणे ठेकेदारास बंधनकारक राहील खोदलेले चर पूर्ववत करण्यासाठी वेगळा / स्वंतत्र खर्च मनपा अदा करणार नाही.

सही/-
कार्यकारी अभियंता (वि)
ब प्रभाग कार्यालय
पिं.चि.म.न.पा, चिंचवड – ३३

सही/-
प्रभाग अधिकारी
ब प्रभाग कार्यालय
पि.चि.म.न. पा, चिंचवड - ३३

जाहिरात क्रमांक :- 133
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड – ३३.
क्रमांक :- बप्र/९ /कावि/ १३०/२०१०

दिनांक :- १३ / ८ /२०१०

Etender/tender.doc